स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**संचालनालय,लेखा व कोषागारे**

कस्तुरी इमारत, तळ मजला,

पेट्रोलियम हाऊस समोर, ज.द.मार्ग, चर्चगेट,मुंबई - ४०० ०२०.

दूरध्वनी क्रमांक:०२२- २२८८०१०६/१७ ई मेल : admin-dat@mah.gov.in संकेतस्थळ:www.mahakosh.gov.in

---

क्र.संलेको/प्रशा-राप/सर्वसाधारण बदली सन २०२५/३८८ दि. 15 APR 2025

संदर्भ १ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२, दिनांक.०९.०४.२०१८

२ वित्त विभाग, परिपत्रक क्र.संलेको २०१८/प्र.क.३५/कोषा प्रशा-२, दिनांक २०.०४.२०१८

३ वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१४/प्र.क्र.१३१/कोषा प्रशा-३, दि.३०.०५.२०१५

४ संचालनालयाचे परिपत्रक क्र.संलेको/प्रशा-राप/सर्वसाधारण बदली सन २०२५/३३१, दि.२८.०३.२०२५

## //परिपत्रक//

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार प्रत्येक वर्षी राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही करण्यात येते.

त्याअनुषंगाने संदर्भीय शासन निर्णयातील तरतुदींनुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या माहे मे-२०२५ मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

सध्याच्या कार्यरत पदावर ज्या अधिकाऱ्यांना किमान तीन व त्यापेक्षा जास्त वर्षाचा कालावधी झाला आहे (दि.३१ मे २०२२ व त्यापूर्वीचे आदेश व दि.३० जून २०२२ पर्यंत रुजू झालेले अधिकारी) अशा लेखा अधिकाऱ्यांची यादी व लेखा अधिकारी संवर्गातील रिक्त पदांची यादी (अवघड/बिगरअवघड क्षेत्रनिहाय) अनुक्रमे परिशिष्ट **"अ "** व **" ब "** मध्ये **संचालनालयाच्या संदर्भ क्र.४ वरील परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आली आहे.**

सदर बिगर अवघड क्षेत्रातील यादीमध्ये श्रीम.कांतिका शशिकांत काजरोळकर, लेखा अधिकारी यांचे नावाचा समावेश करण्यात येत आहे. श्रीम.काजरोळकर यांनी बदलीसाठीचे १० पसंतीक्रम भरण्यासाठी संचालनालयाच्या दि.२८.०३.२०२५ रोजीच्या परिपत्रकात नमुद सूचना व परिपत्रकासोबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या रिक्त पदांच्या यादीचे अवलोकन करावे.

त्यानुसार बदलीसाठीचे १० पसंतीक्रम HRMS प्रणालीद्वारे **दि.३०.०४.२०२५ पर्यंत** सादर करावेत. पसंतीक्रम सादर केल्यानंतर त्याची प्रिंट घेऊन ती आवश्यक कागदपत्रांसह संचालनालयास सादर करावी. एकदा दिलेला विकल्प हा अंतिम राहील.

**प्रसिध्द केलेली रिक्त पदे / बदलीपात्र अधिकाऱ्यांची पदे जर माहे एप्रिल/मे-२०२५ चे सर्वसाधारण बदली आदेश निर्गमित होण्यापूर्वी विनंती / संवर्ग / अंशत: बदल / पदोन्नतीने अथवा अन्य कारणाने भरली गेली तर प्रस्तुत पदांकरिता दिलेला पसंतीक्रम विचारात घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

बदली ही संपूर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम,१९८१ मधील नियम २३ चा भंग केला म्हणून ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील याची महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सर्व लेखा अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

रश्मी नांदिवडेकर

**(रश्मी नांदिवडेकर)**
**सहसंचालक (प्रशासन),**
**लेखा व कोषागारे, मुंबई.**

प्रत : श्रीम.कांतिका शशिकांत काजरोळकर, लेखा अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

D:\05.06.2023\ADMINISTRATION\AO Transfer 2025\सर्वसाधारण बदली 2023 परिपत्रक - श्रीम.काजरोळकर.docx